दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२९३ ■ गुरूवार, दि. १३ फेब्रुवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रुपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -293 ■ Thursday, 13 Feb 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## ऊस तोडणी यंत्रासाठी राज्याने केंद्राला सुधारित प्रस्ताव सादर करावा - गडकरी

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत ऊस तोडणी यंत्रास अनुदान प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी आज केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली येथे बैठक झाली. या बैठकीत सन २०२२-२३ पासून राज्यात राबविण्यात येत असलेल्या योजनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी राज्याचे कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, कृषी आयुक्त सुरज मांढरे, साखर आयुक्त कुणाल



खेमणार, केंद्र शासनाच्या कृषी विभागाचे सह सचिव व अन्य अधिकारी उपस्थित होते.

या योजनेअंतर्गत ९०० ऊस तोडणी यंत्र खरेदीसाठी शासनाने मान्यता दिली असून आत्तापर्यंत राज्यातील २५७ पात्र लाभार्थ्यांनी ऊस तोडणी यंत्राची खरेदी केली आहे.

त्यापैकी ११६ लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम वितरित करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत ऊस तोडणी यंत्र खरेदी किंमतीच्या ४०% अथवा कमाल रु. ३५ लाख अनुदान देण्यात येते. उर्वरित १४१ लाभार्थ्यांना देय असलेली केंद्र शासनाच्या हिस्याची रक्कम त्वरित वितरित करण्याबाबत कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी बैठकीत विनंती केली.

या योजनेचा राज्यातील ऊस उत्पादक शेतकरी, ऊस तोडणी मजुरांच्या संस्था व शेतकरी उत्पादक कंपन्यांना अधिक लाभ मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने योजनेत सुधारणा करून सुधारित प्रस्ताव केंद्र शासनास त्वरित प्रस्ताव सादर करण्याचे केंद्रीय मंत्री श्री नितिन गडकरी यांनी निर्देश दिले. या सुधारित प्रस्तावास केंद्र शासनाची त्वरित मान्यता देण्यात येईल असे श्री गडकरी यांनी स्पष्ट केले.

## आशियातील सर्वात मोठ्या 'एआय' महोत्सवाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून घोषणा

मुंबई : "Mumbai Tech Week 2025' या आशियातील सर्वात मोठ्या 'एआय' महोत्सवाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली. टेक आंत्रप्रेन्योअर्स असोसिएशन ऑफ मुंबई सोबत झालेल्या विशेष बैठकीत त्यांनी मुंबईच्या तंत्रज्ञान क्षेत्राला चालना देण्यासाठी शासन सर्वतोपरी मदत करेल, अशी ग्वाही दिली.

मुख्यमंत्र्यांनी या महोत्सवाच्या माध्यम ातून मुंबईला 'आशियाचा अख सँडबॉक्स' म्हणून जागतिक स्तरावर स्थान मिळवून देण्याचा संकल्प व्यक्त केला. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत' दृष्टिकोनाला गती देण्याच्या दृष्टीने या कार्यक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व उद्योजक, संशोधक आणि तंत्रज्ञांना चढथ २०२५ मध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, अश्विनी वैष्णव, आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

याशिवाय, टाटा समूहाचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन, उद्योगपती आकाश अंबानी तसेच गुगल डिपमाईड, ॲन्थ्रोपिक, स्केल, कृत्रिम, सर्वम, मेटा, गुगल, मायक्रोसॉफ्ट आणि सेल्सफोर्स यांसारख्या आघाडीच्या कंपन्यांचे 'एआय' क्षेत्रातील तज्ज्ञ देखील उपस्थित राहणार आहेत.

ढएअच ही मुंबईतील तंत्रज्ञान उद्योजकांची अग्रगण्य स्वायत्त संघटना आहे. या संघटनेमध्ये ६५ हून अधिक स्टार्टअप आणि युनिकॉर्न कंपन्यांचे संस्थापक असून, त्यांची एकत्रित बाजारपेठेतील किंमत ६० अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक आहे. ढएअच च्या गव्हर्निंग काउंसिलमध्ये ड्रिम११ चे सह-संस्थापक हर्श जैन, हापटिकचे सह-संस्थापक आकृत वैष, द गुड ग्लॅम ग्रुपच्या नय्या साग्गी, लॉगीनेक्स्टचे ध्रुविल संघवी आणि ऋेटळळ चे विशाल गोंडल यांसारखे नामवंत उद्योजक समाविष्ट आहेत.

या महोत्सवाच्या माध्यमातून 'एआय' तंत्रज्ञानाचा व्यावसायिक वापर, स्टार्टअप्ससाठी नवीन संधी, भारतीय 'एआय' संशोधन, आणि उद्योजकांसाठी गुंतवणूक व नोकऱ्या उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. देश-विदेशातील तंत्रज्ञ, संशोधक आणि गुंतवणूकदारांसाठी हा कार्यक्रम या क्षेत्रातील संधींचे दार उघडणारा ठरणार आहे.

## 'तंत्रज्ञान नोकऱ्या खात नाही, याला इतिहास साक्षी';पंतप्रधान नरेंद्र मोदींचे एआय परिषदेत आवाहन

पॅरिस : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पॅरिसमध्ये सुरू असलेल्या एआय परिषदेत मोठी घोषणा केली. भारत आपल्या लार्ज लँग्वेज मॉडेल (मोठ्या भाषिक प्रतिमान) यावर काम करत आहे. त्याचबरोबर एआयवर आधारित ज्ञानाचा पूल तयार करत आहे, असे मोदी म्हणाले. यावेळी एआयशी संबंधित मुद्द्यांवर मोदींनी भाष्य केले. पॅरिसमधील एआय कृती परिषदेचा भारत सह-अध्यक्ष आहे.

एआय परिषदेत बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, ङ्गएआय आता गरज बनले आहे. आमच्याजवळ जगातील सर्वोत्कृष्ट गुणवत्ता आहे. त्याचबरोबर आपल्यावर लोकांची माहिती सुरक्षित ठेवण्याची जबाबदारीसुद्धा आहे. यंत्रांची ताकद वाढत असल्याने काही लोक चिंतेत आहेत. पण, यात काळजी करण्यासारखं काही नाही.

**एआयमुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतील - मोदी**

पंतप्रधान मोदी म्हणाले, एआय लाखो लोकांचे आयुष्य बदलत आहे. काळाबरोबर रोजगाराचे स्वरूपही बदलत आहे. आपल्याला एआयमुळे निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संकटाकडेही लक्ष द्यावं लागेल.



तंत्रज्ञान नोकऱ्या खात नाही, याला इतिहास साक्षी आहे. एआयमुळेही नवीन नोकरीच्या संधी निर्माण होतील आणि आपल्याला नव्या संधीसाठी लोकांना तयार करावे लागेल, असे आवाहन पंतप्रधान मोदींनी केले. पंतप्रधान मोदी यांनी भाषणात भारताच्या एलएलएमबद्दलही (लार्ज लँग्वेज मॉडेल) माहिती दिली. भारत लवकरच आपले लार्ज लँग्वेज मॉडेल विकसित करेल, असे ते म्हणाले. भारताच्या एलएलएम मॉडेलची चर्चा होण्याची ही पहिली वेळ नाही. यापूर्वी केंद्रीय माहिती व तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनीही याबद्दल माहिती दिली होती. भारत लवकरच एलएलएम हे एआय मॉडेल विकसित करेल, असे त्यांनी म्हटले होते.

**येत्या १५ दिवसांत भाजपाचे आणखी ५० लाख सदस्य नोंदविण्याचे लक्ष्य** - संघटन पर्वाअंतर्गत महाराष्ट्र भाजपाने १ कोटी सदस्य नोंदणीचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. येत्या १५ दिवसांत आणखी ५० लाख सदस्य नोंदवून दीड कोटी सदस्य नोंदणीचे लक्ष्य साध्य केले जाईल, असा विश्वास भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी व्यक्त केला.

## मुख्यमंत्र्यांच्या बैठकांना शिंदे गैरहजर, शिवसेना मंत्र्यांच्या नाराजीनंतर उलटसुलट चर्चा

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे, नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर आदी विकास प्राधिकरणांच्या बुधवारी घेतलेल्या बैठकांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गैरहजर राहिले. शिवसेनेच्या मंत्र्यांनी वेगवेगळ्या कारणांवरून मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत नाराजी व्यक्त केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी बुधवारी ही बैठक आयोजित केली होती. परंतु शिंदे यांच्या गैरहजेरीमुळे राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे.

उद्योग खात्यातील अनेक निर्णय प्रशासकीय पातळीवर परस्पर घेतले जात असल्याने मंत्री उदय सामंत यांनी खात्याचे प्रधान सचिव आणि 'एमआयडीसी'च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र लिहून आपली नाराजी व्यक्त केली आहे. मंत्री म्हणून आपल्या अधिकारांवर गदा येत असून महत्त्वाच्या बाबी व निर्णयाबाबतचे प्रस्ताव आपल्या संमतीसाठी ठेवावेत, अशा सूचना सामंत यांनी दिल्या आहेत. तर परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांना अंधारात ठेवून व त्यांच्याकडे कार्यभार न देता एसटीच्या अध्यक्षपदाचा कार्यभार परिवहन खात्याच्या अतिरिक्त मुख्य सचिवांकडे देण्यात आला आहे. यासह अन्य मुद्द्यांवर शिवसेनेच्या मंत्र्यांनी मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीतच नाराजी व्यक्त केली होती. शिवसेनेकडे असलेल्या उद्योग, नगरविकास, परिवहन आदी खात्यांमध्ये मुख्यमंत्र्यांकडून अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जात असल्याने राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्क सुरू झाले आहेत. या पार्श्वभूमीवर नगरविकास खात्याशी संबंधित बैठकीला शिंदे अनुपस्थित राहिल्याची चर्चा आहे. तर मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह संबंधित मंत्री, पालकमंत्री या बैठकांना उपस्थित होते.

शहरांशी संबंधित विकास प्राधिकरणे नगरविकास विभागाच्या अखत्यारीत येतात आणि एकनाथ शिंदे हे या खात्याचे मंत्री असल्याने त्यांची उपस्थिती आवश्यक होती. या बैठकीबाबतचा निरोप त्यांना मंगळवारी दुपारी मिळाला. परंतु आपले पूर्वनियोजित कार्यक्रम असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे या बैठकांना अनुपस्थित राहिले. या बैठकांना न जाता शिंदे कल्याणजवळील मलंगगड उत्सवास उपस्थित राहिले.

**येरवडा-कात्रज भुयारी मार्ग** - पुणे शहरातील दळणवळण गतिमान करण्यासाठी येरवडा ते कात्रज भुयारी मार्ग तयार करावा. हा भुयारी मार्ग 'ट्वीन टनल' पद्धतीने नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून उभारण्याबाबतचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश फडणवीस यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बैठकीत दिले. प्रस्तावित नवीन पुरंदर विमानतळ रस्ते जाळ्यांसाठी सुमारे ६३७ कोटी रुपये, रांजणगाव आणि हिंजवडी औद्योगिक क्षेत्रातील सिमेंट रस्त्यांसाठी २०३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

**प्राधिकरणांनी अद्ययावत संकेतस्थळ सुरू** करावे व ऑनलाईन सुविधा देण्यात याव्यात, आदी सूचनाही फडणवीस यांनी दिल्या.

## राज्यातील संस्था व मदरसे यांची उच्चस्तरीय चौकशी करावी; मंत्री नितेश राणे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्यातील संशयीत संस्था व मदरसे यांची कठोर कारवाई करण्याच्या अनुषंगाने एस.आय.टी. स्थापन करण्यात येवून उच्चस्तरीय चौकशी करावी अशी मागणी मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे (छळींशीह ठरपश) यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

नितेश राणे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले की, जामिया इस्लामिया इशातुल उलूम इन्स्टिट्यूट अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार यांचे अध्यक्ष व संस्थापक व इतर स्टाफ यांनी कोणत्याही प्रकारचा वैध व्हिजा नसताना आधार कार्ड, पॅन कार्ड, जन्म प्रमाणपत्र, बँक खाते अशा प्रकारचे महत्वाचे दस्तऐवज बनवून बेकायदेशीररित्या यमन नागरिकास वास्तव्यास ठेवून इतर सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या व यमन देशातील कुटुंबीय आणि इतरां विरोधात बीएनएस, परदेशी कायदा आण दि टेलिग्राफ कायद्याच्या संबंधित कलमांखाली दिनांक ११.०२.२०२५ रोजी गु.र.नं.३०/२०२५ अन्वये अक्कलकुआ पोलीस ठाणे, जि. नंदुरबार येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राज्यात सुरु असलेल्या सदरील संस्था व मदरश्यांमधून राष्ट्र विरोधी शिक्षण दिले जाणे, विशिष्ट धर्माच्या नागरिकांना बेकायदेशीररित्या आश्रय दिला जाणे, देश विरोधी कारवायांकरीता आर्थिक मदत पुरविली जाते. अशा प्रकारचे कार्य करणाऱ्या संशयीत संस्थांचा शोध घेण्यात येवून त्याच्या आर्थिक व्यवहाराची तपासणी करण्याची मागणी विविध स्तरावरुन मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे.

संशयीत संस्था व सदरील मदरसे यांचेवर कठोर कारवाई करण्याच्या अनुषंगाने एस.आय.टी. स्थापन करण्यात येवून उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत संबंधितांना आदेशित व्हावे,अशी मागणी मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

## 'व्हॅलेंटाईन डे'साठी गुलाबच्या फुलांना देशभरातून मागणी

**नाशिक (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

'व्हॅलेंटाईन डे' च्या पार्श्वभूमीवर गुलाबाला देशभरातून मोठी मागणी वाढली आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी ७ रुपयांना विकला जाणारा गुलाब १० रुपयांना विकला जात आहे. यात ग्राहक टॉप सीक्रेट गुलाबाला अधिक पसंती देत आहे. द्राक्ष, कांदा पाठोपाठ नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणात गुलाबाची शेती केली जाते. प्रेमाचे प्रतीक म्हणून गुलाबाला ओळखले जाते. १४ फेब्रुवारी होणाऱ्या 'व्हॅलेंटाईन डे' मुळे गुलाब भाव खाऊन जात आहे. दोन महिन्यांपूर्वी १५० रुपये डझनने विकला जाणारा गुलाब आता चक्क २०० ते २२० रुपये डझनने विकला जात आहे. त्यामुळे बाराही महिने विविध समारंभासाठी फुलांची मागणी असल्याने शेतकरी फुल शेतीकडे वळाला आहे.

### पॉलिहाऊसमध्ये होणाऱ्या गुलाबाला मागणी

पॉलिहाऊसमध्ये होणाऱ्या गुलाबांना अधिक मागणी आहे. सध्या शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करत पॉलिहाऊसमध्ये फुलांची लागवड करण्यास सुरुवात केली आहे. यासाठी एकरी ५५ ते ६० लाख रुपये खर्च येतो. तसेच उघड्यावरील गुलाब शेतीसाठी एकरी चार ते पाच लाख रुपये खर्च येतो. महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांसाठी पॉलिहाऊस उभारण्यासाठी मोफत मार्गदर्शन दिले जाते. शिवाय एकात्मिक विकास फलोत्पादन अभियानांतर्गत ५० टक्के अनुदान दिले जात आहे.



शहरातील मखमलाबाद सोबत जिल्ह्यातील दिंडोरी, खेडगाव, पालखेड, मोहाडी, जानोरी या भागात ८० हेक्टर क्षेत्रावर फुलशेती केली आहे. १५ हेक्टरवर पॉलिहाऊसमध्ये विविध प्रकारच्या गुलाबाचे उत्पादन होते. यात टॉप सीक्रेट, बोंडेक्स, सिलीयर, सफेद गुलाब, पिंक गुलाब अविलॉन्च या गुलाबांना देशभरातून अधिक मागणी आहे.

नाशिकमधून दररोज दिल्लीला एक लाख तर मुंबईला दोन लाख गुलाब निर्यात केली जाते. तसेच हाच गुलाब पश्चिम आशियासह सिंगापूर, युरोपात व्यापाऱ्यांमार्फत पाठवला जातो.

नाशिक जिल्ह्यातील वातावरण गुलाब शेतीला अनुकूल आहे. त्यामुळं बहुतांशी शेतकरी आता फुलशेतीकडं वळाला आहे. इतर पिकांच्या तुलनेत फुलशेतीत जोखीम कमी असून बाजारपेठही उपलब्ध होते. येथील गुलाब व्यापाऱ्यांमार्फत मुंबई, दिल्लीला जातात. तसेच स्थानिक बाजारपेठेत इव्हेंट मॅनेजमेंट आणि फुल विक्रेत्यांमार्फत शेतकरी फुलांची विक्री करतात.

दरवर्षी जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात लग्न समारंभ, धार्मिक कार्यक्रम तसेच व्हॅलेंटाईन डे असल्यामुळे गुलाबाला अधिक म ागणी असते. जानेवारी आधी साधा गुलाब १५ ते २० रुपये डझन विकला जातो. तोच आता ३५ ते ४० रुपये डझन विकला जात आहे.

# रेल्वे विकास नव्या रुळावर...

भाजपामध्ये सत्तेत आल्यानंतर मोदी सरकारने रेल्वेसाठीचा स्वतंत्र अर्थसंकल्प जाहीर करण्याची प्रथा बंद केली आणि मुख्य अर्थसंकल्पामध्ये रेल्वेसाठीच्या सकल तरतुदींचा उल्लेख केला जाऊ लागला. त्यामुळे अलीकडील काळात रेल्वेअर्थसंकल्पाबाबत पूर्वीसारखी चर्चा, प्रतिक्रिया, प्रवासी संघांची मतमतांतरे या गोष्टी दिसत नाहीत. अर्थात स्वतंत्र अर्थसंकल्पाची प्रथा जरी संपुष्टात आणली असली तरी मोदी सरकारच्या काळात रेल्वेचा खऱ्या अर्थाने कायापालट झाला. रेल्वेचे नवे जाळे निर्माण करताना रेल्वे प्रकल्पांना गती देण्यात आली आहे. तसेच वंदे भारत एक्स्प्रेस, अमृत भारत ट्रेन, बुलेट ट्रेन, महानगरातील मेट्रो प्रकल्पांना अधिक गतिमान करण्यात आल्याचे दिसून आले. देशांतर्गत दळणवळणाच्या क्षेत्रात रेल्वेसेवेचे योगदान मोठे आहे. भारतीय रेल्वे हा एक अद्भुत वाटावा असा उपक्रम आहे. भारतात दररोज सुमारे तीन कोटींहून अधिक प्रवासी रेल्वेने प्रवास करतात. ही संख्या ऑस्ट्रेलियाच्या लोकसंख्येपेक्षा अधिक आहे. यावरुन भारतीय रेल्वेचा पसारा किती मोठा आहे, हे लक्षात येते. त्यामुळेच केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये रेल्वेसाठी कोणकोणत्या तरतुदी केल्या जातात याकडे देशातील मोठ्या लोकसंख्येचे लक्ष असते.

यावेळच्या अर्थसंकल्पात रेल्वेसाठीची तरतूद गतवेळच्या अर्थसंकल्पाइतकीच म्हणजेच २.५२ लाख कोटी रुपये ठेवण्यात आली आहे. त्यामुळे सुरुवातीला अनेकांनी अर्थसंकल्पाकडून रेल्वेची निराशा झाल्याची प्रतिक्रिया नोंदवली. शेअर बाजारातही अर्थसंकल्पाच्या दिवशी आयआरसीटीसीसारख्या रेल्वेशी संबंधित कंपन्यांच्या समभागांमध्ये जोरदार घसरण झाल्याचे दिसून आले. परंतु अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अत्यंत प्रगतिशील अर्थसंकल्प सादर केला असून त्याची संपूर्ण रचना रेल्वे विभागाला मोठी मदत करणार आहे. अर्थसंकल्पात खाण क्षेत्र, ऊर्जा क्षेत्र आणि नागरीकरण यांचा विशेष उल्लेख करण्यात आला असून या तिन्हींच्या विकासाचा सर्वाधिक फायदा भारतीय रेल्वेला होणार आहे. अर्थमंत्र्यांनी कृषी क्षेत्रासाठीच्या तरतुदी करताना भाजीपाला आणि फळांच्या वाहतुकीत कमी कार्बन उत्सर्जन पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी केलेल्या घोषणेचा भारतीय रेल्वेलाही फायदा होईल. त्याचप्रमाणे बिहारमध्ये मखाना बोर्डाच्या स्थापनेमुळे मालवाहतुकीतील नवीन क्षेत्र वाढणार आहे. कापूस उत्पादकता राष्ट्रीय मिशनचा रेल्वेला पश्चिमेकडील राज्यांमधून लोडिंगमध्ये मोठा फायदा होईल. आसाममधील नामरूप येथे वार्षिक १२.७ लाख मेट्रिक टन क्षमतेचा युरिया प्लांट उभारण्याची घोषणा ईशान्येकडील राज्यांच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारी आहे; पण त्यामुळे रेल्वेची वाहतूक वाढेल.

'इंडिया पोस्ट'ला 'लार्ज पब्लिक लॉजिस्टिक ऑर्गनायझेशन'मध्ये रूपांतरित करणे ही या अर्थसंकल्पातील एक अतिशय महत्त्वाची घोषणा आहे. आतापर्यंत रेल्वे मेल सेवा ही एक महत्त्वाची संस्था होती. प्रत्येक रेल्वे मेलमध्ये टपाल विभागाचा एक विशेष कोच असतो. अशा स्थितीत देशभरातील १.५ लाख पोस्ट ऑफिस आणि २.४ लाख डाक सेवक ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील, ही रेल्वेमंत्र्यांची घोषणा लक्षात घेता ती रेल्वे आधारित सेवांना मोठी चालना देणारी आहे. सूक्ष्म, लघू, मध्यम उद्योगांमध्ये मोठी गुंतवणूक येत असून त्यामुळे रेल्वेची क्षमताही वाढेल. रेल्वेच्या आधुनिकीकरणाबाबत आणि त्याच्या शंभर टक्के विद्युतीकरणाच्या दिशेने वेगाने पावले टाकली जात आहेत. त्याअनुषंगाने अर्थमंत्र्यांनी ऊर्जा क्षेत्रासाठी केलेल्या घोषणांचा खोलवर विचार करावा लागेल. विशेषत: वीजपुरवठ्याच्या पायाभूत सुविधांच्या विस्ताराच्या क्षेत्रात होत असलेल्या गुंतवणुकीमुळे आगामी काळात रेल्वेच्या वितरण खर्चातही घट होणार आहे. याचा फायदा रेल्वेच्या अर्थकारणाला होणार आहे.

या अर्थसंकल्पात अणुऊर्जा अभियानांतर्गत २०४७ पर्यंत १०० गिगावॉट अणुऊर्जा निर्मितीचे लक्ष्य गाठण्यासाठी २०,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अणुऊर्जा ही स्वच्छ ऊर्जा आहे. रेल्वे आणि मेट्रोला इको-फ्रेंडली बनवण्यासाठी ऊर्जेचा मोठा फायदा होणार आहे. त्याचप्रमाणे, खाण क्षेत्रात केलेल्या घोषणांचाही रेल्वेला फायदा होईल, कारण यामुळे रेल्वे कनेक्टिव्हिटीचा विस्तार होईल. गती शक्ती योजनेच्या बळकटीकरणाचेही प्रत्यक्ष लाभ भारतीय रेल्वेला मिळणार आहेत. स्पीड पॉवरचा अर्थ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वेगाने माल नेणे. यामुळे कमीत कमी ऊर्जा वापरली जाईल आणि कार्बन उत्सर्जनही कमीत कमी होईल. या योजनेअंतर्गत रेल्वे आणि मेट्रो सेवांचा विस्तार करण्यात येत आहे. या अर्थसंकल्पात पर्यटन क्षेत्रावर अधिक भर देण्यात आला आहे. देशातील पन्नास पर्यटन स्थळे आणि भगवान बुद्धांशी निगडित क्षेत्रांचा विकास करण्यात येणार आहे.

भारतीय रेल्वेमध्ये महाराष्ट्र हे प्रमुख राज्य आहे. देशाची आर्थिक राजधानी असणाऱ्या मुंबईमध्ये लोकल सेवा आणि रेल्वेसेवा या जीवनवाहिन्या आहेत.

# रेडिओः मनोरंजनाचे सर्वात जुने माध्यम

'सुजलाम् सुफलाम् मलयज शितलाम्; शस्य शामलाम् मातरम्, वन्दे मातरम !' असे सकाळचे मंगल सूर आज हरवले आहे, असे वाटते. एकेकाळी रेडिओ हा आपल्या जीवनाचा एक महत्वाचा भाग मानला जात होता. कारण माहिती, संवाद आणि गाण्यांच्या माध्यमातून मनोरंजनाचे महत्त्वपूर्ण माध्यम म्हणून रेडिओचा उपयोग केला जात होता. मात्र, आज सर्वत्र नवनवीन माध्यमे आली आणि रेडिओचा वाापर कमी झाला. दरवर्षी १३ फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक रेडिओ दिवस' म्हणून साजरा केला जातो. परंतु टेलिव्हिजन आणि मोबाईलचा शोध लागल्यानंतर रेडिओचा वापर कमी झाला. मात्र, आजूनही रेडिओचे महत्त्व कमी झालेले नाही. जागितक रेडिओ दिनाच्या निमित्ताने त्यासंदर्भातील संकलित माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी सादर करत आहेत.

(आंतरराष्ट्रीय रेडिओ दिन.)

जगभरातील लोकांना शिक्षित करण्याबरोबरच आजपर्यंत माहितीची देवाणघेवाण आणि रेडिओने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. तसेच रेडिओ हे पत्रकारांसाठीसुद्धा एक महत्त्वाचे व्यासपीठ म्हणून उदयास आले आहे. रेडिओ हे माहिती पसरविण्याचे सर्वात शक्तिशाली साधन आहे. १३ फेब्रुवारी १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघात रेडिओचे पहिल्यांदा प्रसारण झाले. त्यामुळे हा दिवस जागतिक रेडिओ दिन म्हणून साजरा केला जातो. पहिला जागतिक रेडिओ दिन औपचारिकपणे २०१२मध्ये साजरा करण्यात आला होता. जागतिक रेडिओ दिन २०२२ची थीम ''एवोलूशन- द वर्ल्ड इज ऑलवेज चेंजिंग' होती. म्हणजेच विकासाबरोबर जगाचाही विकास होत आहे. थीम रेडिओची लवचिकता आणि टिकाऊपणा दर्शवते. याचा अर्थ जग जसजसे बदलत आहे, तसे रेडिओमध्येही नावीन्यता येत आहे. तरी आजही तो काळ आठवतो जेव्हा आपण रेडिओ ऐकून आनंदीत व्हायचो.



जागतिक रेडिओ दिवस दरवर्षी १३ फेब्रुवारी रोजी जगभरात साजरा केला जातो. या दिवशी दरवर्षी युनेस्को जगातील सर्व प्रसारक, संस्था आणि समुदायांच्या सहकार्याने विविध कार्यक्रम आयोजित करीत असतो. संवादाचे माध्यम म्हणून रेडिओच्या भूमिकेवर चर्चा करून लोकांना त्याबद्दल जागरूक केले जाते. रेडिओ ही जगभरातील माहितीची देवाणघेवाण करणारी सेवा आहे. आपत्ती किंवा आपत्कालीन परिस्थितीत रेडिओचे महत्त्व वाढते. अशा परिस्थितीत जगभरातील तरुणांना रेडिओची गरज आणि महत्त्वाची जाणीव करून देणे, हा जागतिक रेडिओ दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. माहितीचा प्रसार करण्यासाठी रेडिओ हे सर्वात शक्तिशाली आणि स्वस्त माध्यम म्हणून ओळखले जाते. रेडिओ हे युगानुयुगे असले तरी त्याचा वापर संवादासाठी केला जात आहे. जागतिक रेडिओ दिवस कधी आणि का सुरू झाला? सन २०११ साली जागतिक रेडिओ दिनाची सुरुवात झाली. सन २०१०मध्ये स्पॅनिश रेडिओ अकादमीने प्रथमच १३ फेब्रुवारी हा जागतिक रेडिओ दिवस म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला. युनेस्कोच्या सदस्य देशांनी सन २०११मध्ये हा प्रस्ताव स्वीकारला आणि हा जागतिक रेडिओ दिवस म्हणून घोषित केला. नंतर सन २०१२मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेनेही ते स्वीकारले. त्यानंतर त्याच वर्षी १३ फेब्रुवारी रोजी युनेस्कोने प्रथमच जागतिक रेडिओ दिवस साजरा केला. याच दिवशी जागतिक रेडिओ दिन साजरा करण्याचे एक खास कारण आहे. वास्तविक, संयुक्त राष्ट्र रेडिओ १३ फेब्रुवारी १९४६ रोजी सुरू झाला. संयुक्त राष्ट्र रेडिओच्या वर्धापनदिनानिमित्त जागतिक रेडिओ दिवस साजरा केला जाऊ लागला.

रेडिओ म्हणजे काय? रेडिओ म्हणजे एक असे यंत्र, जे विजेचा वापर करून इलेक्ट्रोमॅग्नेटिक तरंगे तयार करते, ज्यांच्या द्वारे संदेशाची देवाणघेवाण केली जाते. इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव्ह पाठवणाऱ्या रेडिओला ट्रान्समीटर तर तरंगे म्हणजेच वेव्ह स्वीकारून त्याचे रूपांतर आवाजात करणाऱ्या रेडिओला रिसीव्हर असे म्हटले जाते. रेडिओ ३०० एचझेड इतक्या क्षमतेने इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव्ह तयार करू शकते. जगातला पहिला रोडिओ इटलीचे शास्त्रज्ञ मार्कोनी यांनी बनवला. सन १८९५मध्ये त्यांनी रेडिओचा शोध लावला आणि त्याचे पेटंटही मिळवले. मार्कोनीला फादर ऑफ रेडिओ असेही म्हणतात. इंग्रजांनी आणि अनेक युरोपीयन देशांनी हे तंत्रज्ञान आपापल्या वसाहतीत नेले. याच माध्यमातून अमेरिका, आफ्रिका, आशिया खंड आणि ऑस्ट्रेलिया असा रेडिओचा प्रसार झाला. त्या काळी हे माध्यम प्रामुख्याने कम्युनिकेशनसाठी वापरले जात होते.

विशेषतः युद्धकाळात बातम्या लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी, अनेक खेळांच्या कॉमेंट्रीसाठी रेडिओचा वापर होऊ लागला. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातही ब्रिटिशांनीच रेडिओ आणाला. दि.२३ जुलै १९२७ रोजी मुंबई आणि कलकत्ता येथे ऑल इंडिया रेडिओ नावाची दोन केंद्रे सुरू झाली. त्यानंतर सन १९३२मध्ये भारत सरकारने भारतीय प्रसारण सेवा नावाचा एक विभाग सुरू केला. सन १९३६मध्ये त्याचे नाव ऑल इंडिया रेडिओ- एआईआर असे ठेवण्यात आले. दरम्यान, सन १९२०चे दशक येता येता रेडिओला व्यावसायिक स्वरुप प्राप्त झाले. तसेच सन १९५०पर्यंत रेडिओ लोकप्रिय झाला होता. भारतातही रेडिओची सुरुवात सन १९२०च्या दशकात झाली. दि.२३ जुलै १९२७ रोजी मुंबईतून रेडिओ प्रसारण सेवा सुरू झाली. तसेच इंडियन ब्रॉडकास्टींग कंपनी लिमिटेडने मुंबई आणि कोलकता येथे रेडिओ स्टेशन सुरू केले. परंतु सन १९३०मध्ये ही कंपनी बंद पडली. त्यानंतर सरकारने ही कंपनी आपल्या ताब्यात घेत त्याला इंडियन स्टेट ब्रॉडकास्टींग सर्विस असे नाव दिले. त्यानंतर दि.८ जून सन १९३६मध्ये त्यांचे ऑल इंडीया रेडीओ असे नामकरण करण्यात आले. तसेच सन १९५६मध्ये पुन्हा याचे नाव बदलत आकाशवाणी करण्यात आले. हळूहळू आकाशवाणीचे जाळे देशभर पसरू लागले. आज २३ भाषांमध्ये ४१५ रेडिओ स्टेशनसह ऑल इंडीया रेडीओ ही जगातल्या सर्वात मोठ्या रेडिओ प्रसारण सेवेपैकी एक बनली आहे. तसेच सन २००१मध्ये भारतात खासगी रेडिओ स्टेशनलासुद्धा सुरुवात झाली होती.

रेडिओ हे सर्वात जुने माध्यम असले तरी, संवादाचे एक महत्त्वाचे माध्यम म्हणून त्याच्याकडे बघितले जाते. सन १९४५मध्ये आजच्याच दिवशी संयुक्त राष्ट्र संघात रेडिओचे पहिले प्रसारण झाले होते. त्यामुळे हा दिवस 'जागतिक रेडिओ दिवस' म्हणून साजरा केला जातो.

स्पेन रेडिओ अकादमीने सन २०१०मध्ये 'जागतिक रेडिओ दिवस' साजरा करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर युनेस्कोच्या ६७व्या सत्रात १३ फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक रेडिओ दिवस' म्हणून घोषित करण्यात आला. युनेस्कोच्या या निर्णयाला संयुक्त राष्ट्रसंघाने दि.१४ जानेवारी २०१३ रोजी मान्यता दिली. दरवर्षी युनेस्कोद्वारे जगभरातील रेडिओ प्रसारक आणि संघटनांनाच्या मदतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. तसेच संवादाचे माध्यम म्हणून रेडिओच्या भूमिकेवरसुद्धा चर्चा केली जाते. यावर्षी जागतिक रेडिओ दिवसाला 'रेडिओ आणि विविधता' ही थीम देण्यात आली आहे. तसेच विकास, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि संपर्क असे सबथीम सुद्धा देण्यात आले आहे.

!! समस्त श्रोत्यांना जागतिक रेडिओ दिनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

# पत्रकार कसा असावा? सत्याचा शोध घेणारा की सत्तेचा गुलाम?

लोकशाहीचे चार महत्त्वाचे स्तंभ आहेत. विधायिका, कार्यकारी यंत्रणा, न्यायपालिका आणि पत्रकारिता. यातील पत्रकारितेला 'लोकशाहीचा चौथा स्तंभ' म्हणून संबोधले जाते, कारण ती सत्तेच्या विरोधात असली पाहिजे, जनतेच्या बाजूने उभी राहिली पाहिजे आणि अन्यायाविरुद्ध लढली पाहिजे. मात्र, सध्या पत्रकारितेचे स्वरूप बदलत चालले आहे.

पूर्वीची आणि आजची पत्रकारिता

स्वातंत्र्यपूर्व काळात पत्रकारिता ही समाजप्रबोधन आणि ब्रिटिश सत्तेविरोधातील लढ्यासाठी वापरण्यात आली. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पत्रकारितेचा उपयोग समाजसुधारणेसाठी केला. मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, समता यांसारख्या वृत्तपत्रांद्वारे बाबासाहेबांनी अस्पृश्यतेविरोधात आणि सामाजिक समतेसाठी आवाज उठवला. स्वातंत्र्यानंतर काही दशकांपर्यंत पत्रकारितेने सत्य मांडण्याची परंपरा कायम ठेवली. मात्र, २०१४नंतरच्या काळात पत्रकारिता मोठ्या प्रमाणावर बदलली आहे. आज ९५%माध्यमे सत्ताधाऱ्यांच्या बाजूने उभी आहेत.

सध्याच्या पत्रकारितेतील समस्या

१. सत्ताधाऱ्यांच्या समर्थनासाठी वाकलेली पत्रकारिता: सरकारच्या चुकीच्या धोरणांवर प्रश्न विचारण्याऐवजी बहुतांश पत्रकार सरकारचे गुणगान गाताना दिसतात.

२. भांडवलशाहीचा प्रभाव: मोठ्या उद्योगपतींनी वृत्तवाहिन्या आणि वृत्तपत्रे खरेदी केली असून, त्यामुळे त्यांच्या व्यावसायिक फायद्यासाठी पत्रकारिता वाकवली जात आहे.

३. वास्तविक प्रश्नांना बगल: महागाई, बेरोजगारी, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या विषयांऐवजी विनाकारण हिंदू-मुस्लिम वाद, मंदिर-मशीद वाद यांना महत्त्व दिले जाते.

४. पत्रकारांचा छळ आणि हत्या: सत्ताधाऱ्यांच्या विरोधात लिहिणाऱ्या पत्रकारांवर खोटे गुन्हे दाखल होतात, त्यांना धमक्या दिल्या जातात, काहींची हत्या देखील होते.

५. निष्पक्षतेचा अभाव: पत्रकारितेतील मोठी नावे राजकीय पक्षांसोबत जोडली जात आहेत, त्यामुळे सत्य समोर येत नाही.

पत्रकारांनी कसे असावे?

१. निष्पक्ष आणि निर्भीड: पत्रकार हा सरकारचा प्रचारक नसावा, तर सत्याचा शोध घेणारा असावा.

२. संविधाननिष्ठ: संविधानाच्या मुल्यांवर आधारित पत्रकारिता करणे अत्यावश्यक आहे.

३. जनतेच्या बाजूने उभा राहणारा: शेतकरी, कामगार, कष्टकरी आणि सामान्य नागरिक यांच्या प्रश्नांवर प्रकाश टाकणारा असावा.

४. सत्ताधाऱ्यांना जाब विचारणारा: पत्रकार हा सत्तेच्या दबावाला बळी न पडता सरकारला जबाबदार धरू शकणारा असावा.


पत्रकार हा लोकशाहीचा खरा रक्षक असतो. मात्र, जर पत्रकार विकले गेले, तर समाजाला दिशाहीन करण्याचे काम होते. त्यामुळे पत्रकार हा सत्ताधाऱ्यांचा गुलाम नसावा, तर तो जनतेच्या बाजूने उभा राहणारा आणि निर्भीड असावा. सध्याच्या बिकट परिस्थितीत संविधाननिष्ठ आणि सत्यनिष्ठ पत्रकारांचीच खरी गरज आहे.

**- रतनकुमार साळवे**
छत्रपती संभाजीनगर

# 'डीसल्फरायझेशन' हवे की वीज दरवाढ... की प्रदूषण?

'डीसल्फरायझेशन'चीच सक्ती का?

औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पांमध्ये कोळशाच्या ज्वलनातून 'फ्ल्यू गॅस' तयार होतो. त्यात कार्बन डायऑक्साईड, सल्फ्रर डायऑक्साईडसह विविध घटक असतात. सल्फ्रर डायऑक्साईड हा मानवी आरोग्याच्या दृष्टीने हानीकारक असून त्याचे प्रमाण मर्यादेपेक्षा अधिक वाढू देणे योग्य नसते. यामुळे माणसाला श्वसन, फ्फुफ्फुसे, हृदयाचे आजार, नाक, डोळे, घशाची जळजळ असे प्रकार होतात. विशेषत: औष्णिक वीजप्रकल्पापासून ३०-६० किमी अंतराच्या परिसरातील नागरिकांना सल्फ्रर डायऑक्साईडच्या प्रदूषणामुळे त्रास होऊ शकतो. प्रकल्पामुळे होत असलेल्या वायू प्रदूषणाविरोधात अनेक स्वयंसेवी संघटनांनी देशभरात आवाज उठवला. मग केंद्रीय पर्यावरण खात्याने २०१९ नंतर सर्व औष्णिक वीज प्रकल्पांना डीसल्फरायझेशन प्रक्रिया युनिट बसविण्याची सूचना केली. यासाठी सुरुवातीला दोन वर्षांची मुदत देऊन नंतर ती काही वेळा वाढविली गेली.



**डीसल्फरायझेशन प्रक्रिया कशी असते?** - कोळशाच्या ज्वलनातून बाहेर पडणारा, विविध रासायनिक घटक असलेला वायू आम्लयुक्त असतो. त्यातील सल्फ्रर डायऑक्साइडवर प्रक्रिया करण्यासाठी आम्लारींचा (अल्कलाईन) वापर करावा लागतो. त्यासाठी चुनकळी किंवा सोडियम बाय कॉर्बोनेटचा फ्रवारा भट्टीतून बाहेर पडणाऱ्या वायूवर मारला जातो. तेव्हा उदासीनीकरणाची प्रक्रिया होऊन राखेबरोबरच कॅल्शियम ऑक्साईड व अन्य घटक. स्थायू किंवा पावडर स्वरूपात तयार होतात. सल्फर डायऑक्साइडमुक्त वायू चिमणीतून हवेत सोडला जातो. ही रासायनिक प्रक्रिया करण्यासाठी डी सल्फरायझेशन युनिट उभारावे लागते. पण त्यासाठी मोठा खर्च येत असल्याने आतापर्यंत त्याकडे फारसे लक्ष दिले गेले नाही.

ही सक्ती कोणी पाळली? - देशात सर्वाधिक औष्णिक वीजप्रकल्प राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळ (एनटीपीसी) चे असून त्यांची स्थापित क्षमता सुमारे ६० हजार मेगावॉटहून अधिक आहे. त्यापैकी सुमारे १२ हजार मेगावॉटच्या प्रकल्पांमध्ये ही युनिट बसविण्यात आली आहेत. त्यासाठीचा खर्च ग्राहकांकडून वसूल करण्याची परवानगी केंद्रीय वीज प्राधिकरणाने एनटीपीसीला दिली आहे. अदानी, रतन इंडिया यांसारख्या खासगी वीज कंपन्यांनीही ही युनिट बसविण्यास सुरुवात केली आहे. महाराष्ट्रातील 'महानिर्मिती' वीज कंपनी किमान सहा-सात हजार मेगावॅट वीजनिर्मिती करते; मात्र महानिर्मिती कंपनीने ही युनिट बसविण्यास सुरुवात केलेली नाही. अन्य अनेक राज्यांच्या वीजनिर्मिती कंपन्यांनीही ही युनिट्स बसविलेली नाहीत.

**खर्च वाढल्याने 'सक्ती'बद्दल फ्फेरविचार?** - औष्णिक वीज प्रकल्पात फ्ल्यू गॅस डीसल्फ्फरायझेशन (एफ्फजीडी) युनिट्स उभारण्याबाबत गेली पाच-सहा वर्षे चर्चा सुरू आहे. किरकोळ प्रमाणात हे काम सुरू झाले. या युनिटसाठी एका मेगावॉटला किमान एक कोटी रुपये खर्च येतो. त्यामुळे प्रतियुनिट ३५-४० पैसे इतकी वीजदरवाढ करावी लागेल. आधीच वीजदर महागडे असताना त्यात ही भर पडल्यास ग्राहकांमध्ये असंतोष निर्माण होईल, त्यामुळे ही युनिट उभारणे टाळण्यात आले. त्याचबरोबर तांत्रिक मुद्द्यांवरही मतमतांतरे आहेत.

## सह्याद्री इंग्लिश स्कूलमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम व आनंदनगरी संपन्न



**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गल्ले बोरगाव येथील सह्याद्री इंग्लिश स्कूलमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम व आनंद नगरी मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

मंगळवार दि.११ रोजी सायंकाळी संस्थापक अरुण पाटे यांच्या मार्गदर्शना खाली या आनंदनगरी व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे खास आकर्षण टीव्ही चॅनल वरील मालिका तारक मेहता, सीआयडी फेम प्रसिद्ध अभिनेते नंदू भुरे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती, तर सहायक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे, पोलीस उपनिरीक्षक संतोष पाटे, सरपंच विशाल खोसरे, भद्रा मारुती संस्थानाचे सदस्य बाबासाहेब बारगळ, राम दास पाटे ,आबासाहेब बारगळ, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष राजेंद्र बढे, पत्रकार अण्णा जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम भद्रा मारुती संस्थानाचे सदस्य बाबासाहेब बारगळ, सरपंच विशाल खोसरे, सहायक पोलीस निरीक्षक संदीप गोरे, पोलीस उपनिरीक्षक संतोष पाटे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व सरस्वती मातेचे प्रतिमा पुष्पहार घालून प्रतिमा पूजन करण्यात आले व तदनंतर दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष अरुण पाटे, व संचालिका अश्विनी पाटे यांनी कार्यक्रमासाठी उपस्थित प्रमुख मान्यवरांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तदनंतर पाहुण्यांच्या हस्ते वार्षिक क्रीडा महोत्सवातील विजेत्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह स्मृतिचिन्ह सत्कार करण्यात आला. सांस्कृतिक कार्यक्रमा दरम्यान सह्याद्री इंग्लिश स्कूलच्या बाल गोपाल चिमुकल्यांनी विविध प्रकारचे नृत्य सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवित मन जिंकली, या मध्ये वारकरी नृत्य, आदिवासी नृत्य, गवळण, मंगळागौर, कोळी नृत्य, धनगर नृत्य, शेतकरी नृत्य, सादर करण्यात आले होते. त्यानंतर प्रमुख पाहुण्यासह सर्व पालक, विद्यार्थ्यांनी आनंदनगरीचा आनंद घेतला .

या वेळी मुख्याध्यापक सागर देवरे, उपमुख्याध्यापक श्रीमती भारती धुरी, उपसहाय्यक मीरा वगावाड, मनीषा गायकवाड, सांस्कृतिक विभाग प्रमुख अर्चना हारदे, जाधव मिस, संगीता बारगळ, बागेश्वरी मिस, पायल नागे, सोनम भावंडे, कोमल हरक, बागेश्वरी बारगळ, अर्चना कुमावत, धनश्री लेकुरवाळे, रोहिणी नलावडे, कांचन खोसरे, शोभा खिल्लारे, पवन वाघ, मनोज बोडके, ऋषिकेश इंगळे किरण जामकर, कृष्णा, उमा गायकवाड, ठेंगडे, दुधारे, यांनी कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. तर कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने पालक वर्ग यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

संत रविदास महाराज यांच्या जयंतनिमित्त आज महानगरपालिका मुख्यालय येथे मा.उप आयुक्त तथा विभाग प्रमुख लखीचंद चव्हाण यांच्या हस्ते संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्य लेखा परीक्षक शिवाजी नाईकवाडे, अधीक्षक विनोद परदेशी, माहिती व जनसंपर्क विभागाचे रविंद्र खरात, अतुल बनकर, संतोष कोठाळे, करण साळवे, नावेद खान, तसेच सामाजिक कार्यकर्ते गणेश गरंडवाल, संजय जाटवे, बाबुलाल नागवने आदींची उपस्थिती होती.

## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर दोन दिवस जिल्हा दौऱ्यावर

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष श्रीमती रुपाली चाकणकर ह्या गुरुवार दि.१३ व शुक्रवार दि.१४ असे दोन दिवस जिल्हा दौऱ्यावर येत असून जिल्ह्यातील महिला अधिकाऱ्यांची कार्यशाळा, जनसुनावणी, महिलांच्या प्रश्नांसंदर्भात आढावा बैठक व पत्रकार परिषद असे दोन दिवस त्यांचे कार्यक्रम आहेत.



गुरुवारी(दि.१३) महिला अधिकाऱ्यांची कार्यशाळा – गुरुवार दि.१३ रोजी जिल्ह्यातील महिला अधिकाऱ्यांची कार्यशाळा आयोजीत करण्यात आली आहे. जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या महिला सक्षमीकरण अभियानाच्या अनुषंगाने विविध शासकीय कार्यालयातील महिलांसाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन सभागृहात गुरुवार दि.१३ रोजी सकाळी पावणे दहा ते सायं.४ यावेळात ही कार्यशाळा होणार आहे. महिलांच्या विविध समस्या, त्यावरील उपाययोजना, महिलांचे आरोग्य, सुरक्षितता तसेच महिलांसाठी असणाऱ्या विविध योजना व त्यांची प्रभावी अंमलबजावणी याबाबत या कार्यशाळेत महिलांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील महिला अधिकाऱ्यांनी या कार्यशाळेस उपस्थित रहावे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

**शुक्रवारी(दि.१४) जनसुनावणी**

महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई येथे असल्याने राज्यातील अनेक महिलांना मुंबई येथे पोहोचणे शक्य होत नाही. त्यानुषंगाने महिलांना त्यांच्या तक्रारीबाबत स्थानिकस्तरावर आपले म्हणणे मांडण्याकरिता 'महिला आयोग आपल्या दारी' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत छत्रपती संभाजीनगर येथे शुक्रवार दि.१४ रोजी सकाळी साडेदहा वा. जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय येथे जनसुनावणी घेण्यात येणार आहे. या जनसुनावणीसाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष श्रीमती रूपाली चाकणकर उपस्थित राहणार आहेत. त्यांचे समवेत सदस्य सचिव श्रीमती नंदिनी आवडे या उपस्थित राहणार आहेत. जिल्हयातील कोणतीही तक्रारदार पिडीत महिला कोणतीही पुर्वसुचना न देता सदर स्थानिक पातळीवर थेट जनसुनावणीस उपस्थित राहुन आपली लेखी समस्या / तक्रार आयोगापुढे मांडु शकेल. या जनसुनावणीस पोलीस, प्रशासन, विधी सल्लागार, समुपदेशक, जिल्हा समन्वयक असे विविध प्रशासकीय प्रमुख उपस्थित असल्याने तात्काळ कार्यवाही करणे शक्य होते. तरी या जनसुनावणीस छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जास्तीत जास्त तक्रारदार पिडीत महिलांनी उपस्थित राहून आपल्या समस्या मंडाव्यात, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

**आढावा बैठक व पत्रकार परिषद**

तसेच महिला व बालकांच्या प्रश्नांबाबत जिल्हाधिकारी, कामगार आयुक्त, पोलीस अधीक्षक, आरोग्य, परिवहन, शिक्षण आदी विभागांची आढावा बैठक श्रीमती चाकणकर ह्या शुक्रवार दि.१४ रोजी दुपारी ३ वा. घेणार आहेत. त्यानंतर सायं. ५ वा. त्या पत्रकार परिषदेत पत्रकारांशी संवाद साधणार आहेत.

# अविस्मरणीय होणार यंदाचा 'शिवजन्मोत्सव'; क्रांती चौकात फटाक्यांची आतषबाजी, भव्य दीपोत्सव

### जिल्हा शिवजयंती अध्यक्ष डॉ. बाळासाहेब थोरात यांची पत्रकार परिषदेत माहिती

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती छत्रपती संभाजीनगर जिल्हा शिवजयंती महोत्सव समीतीच्या वतीने १९ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात येणार असून शिवजयंतीच्या पूर्व संध्येला क्रांती चौकात फटाक्यांच्या आतषबाजीत भव्य दीपोत्सव साजरा करण्यात येणार असून यंदाचा हा ङ्गशिवजन्मोत्सवङ्ग अविस्मरणीय ठरणार असल्याचे जिल्हा शिवजयंती महोत्सवाचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब थोरात यांनी बुधवारी (दि.१२) आयोजित पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

यावेळी जिल्हा शिवजयंती महोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराजभाऊ पवार, माजी अध्यक्ष अनिल बोरसे, कार्याध्यक्ष अभिजीत देशमुख, नंदकुमार घोडेले, राजू शिंदे, प्रा.चंद्रकांत भराट, सुरेश वाकडे, राजेंद्र दाते पाटील, कृष्णा बनकर, नागराज गायकवाड, अभिषेक देशमुख, लक्ष्मीनारायण बाखरीया, हर्षदा शिरसाट, मकरंद कुलकर्णी, प्रभाकर मते, विजय वानखेडे, अरविंद जाधव, रामदास जाधव, मिथुन व्यास, हरीश शिंदे, अभिजित थोरात व प्रसिद्धी प्रमुख सचिन लिला सुखदेव अंभोरे यांची यावेळी व्यासपीठावर उपस्थिती होती.





जिल्हा शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने १३ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रम तसेच कार्यक्रम ाबाबत माहिती देताना डॉ. बाळासाहेब थोरात यांनी सांगितले की, जिल्हा शिवजयंती महोत्सव समितीचे यंदाचे हे ५६ वे वर्ष असून या समितीची स्थापना १९७० मध्ये ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पृथ्वीराज पवार यांनी केली होती. अखंड पणे सातत्यपुर्ण आणि एकात्मतेचा संदेश देणारी एवढी जुनी महोत्सव समिती देशात एकमेव असुन अनेक समाजोपयोगी उपक्रम समितीद्वारे राबविण्यात येत आहे. संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज भाऊ पवार यांच्या मार्गदर्शनात यंदाचीही शिवजयंती महोत्सव समिती एकात्मतेचा संदेश देणारी ठरेल असा विश्वास शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला.

शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने १३ फेब्रुवारी रोजी वेरूळ येथील मालोजी राजे यांच्या गढीवर सकाळी १०.३० वाजता स्वराज्य संकल्पक शहाजीराजे स्मारक यांना अभिवादन करून गढीवर ध्वजारोहण करण्यात येईल. तर १३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान क्रांती चौक येथे सकाळी ८.३० ते ११.३० वाजे दरम्यान छत्रपती शिवचरित्र पारायण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून प्रा. चंद्रकांत भराट यांच्या संयोजनात या शिवचरित्र पारायण सोहळ्याचे उद्घाटन सर्व धर्मीय ग्रंथ दिंडीने सकाळी ८ वाजता होईल. यावेळी मराठी, इंग्रजी, उर्दू व सर्व माध्यम ांचे शालेय विद्यार्थी छत्रपती शिवचरित्र पारायण सप्ताहाचे वाचन करतील. तर १४ फेब्रुवारी रोजी शहरातील विविध शाळांच्या परिसरात सकाळी १० ते १२ वाजेदरम्यान किल्ले बनवा स्पर्धा होईल. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता क्रांती चौक येथून शहरातील विविध महापुरुषांच्या पुतळ्याची साफ सफाई अभियान राबवून अभिवादन करण्यात येईल. १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते १२ वाजेदरम्यान शहरातील विविध शाळांमध्ये शालेय स्तरावर चित्रकला स्पर्धांचे शाळेच्या सोयीनुसार आयोजन करण्यात आले आहे. १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.३० ते ७.०० दरम्यान भव्य दीपोत्सव, ७ ते ९ या वेळेत शिवजन्मोत्सव सोहळा, पोवाडे तर रात्री ११.३० ते ११.५५ या वेळेत भव्य दिव्य अशी फटाक्यांची आतषबाजी करण्यात येणार आहे. तर १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.३० वाजता क्रांती चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर ध्वजारोहण करून अभिवादन करण्यात येणार आहे. तर दुपारी १२ ते सायंकाळी ६ वाजेदरम्यान शिवगीत व कविता वाचन होईल. तर रात्री ९.४५ ते १० वाजेदरम्यान महाराष्ट्र राज्य गीताचे सामुहिक गायन होईल. तर सायंकाळी ६ ते रात्री ११.५५ दरम्यान ध्वनीक्षेपकांवर शिवगीत वाजवून विविध सांस्कृतिक कार्यक्रम स्थानिक कलावंतांच्या सहभागाने सादर होणार असल्याचे शिवजयंतीचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब थोरात यांनी सांगितले. या शिवजन्मोत्सव सोहळ्यात प्रत्येक शिवभक्तांनी सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## टवाळखोरांची उभ्या कारला धडक, श्रेयनगरात भरदिवसा थरार

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

टवाळखोरांच्या सुसाट कारने रस्त्यावर उभ्या कारला जोराची धडक दिली. या धडकेमुळे एअर बॅग उघडल्याने टवाळखोर बचावले. श्रेयननगरात सोमवारी (दि. १०) दुपारी सव्वातीन वाजता हा थरार पाहून अनेकांच्या जीवाचा थरकाप उडाला. याप्रकरणी ओम सचिन देवकर (१९, रा.चेतक घोड्याजवळ, जवाहर नगर) याच्यावर उस्मानपूरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





काल्डा कॉर्नर येथून भरधाव कार (एमएच २०, एफपी ६६४७) दुपारी तीनच्या सुमारास श्रेयनगरात तीन ते चार विशीतील कारमध्ये बसले होते. श्रेयनगर ते ज्योतीनगर या अरुंद रस्त्यावरून त्यांनी सुसाट वेगाने चार ते पाच चकरा मारल्या. टवाळखोरांनी अक्षरशः धुमाकूळ घातला. त्यांच्या कारची गती पाहूनच अनेकांचा थरकाप उडाला. टवाळखोर कारचालक सुसाट जात असताना नागरिकांचा थरकाप होत होता. कारचा वेग पाहता नक्कीच दुर्घटना होईल, असे प्रत्यक्षदर्शींना वाटत होते. प्रत्यक्षात झालेही तसेच, टवाळखोरांच्या भरधाव कारने रस्त्यात उभ्या असणाऱ्या बुंदाई व्हर्ना कारला (एमएच २०, डीव्ही ६५७८) जोराची धडक दिली. धडक होताच जोरदार आवाज झाल्याने अनेकजण अपघातस्थळी धावले. धडकेनंतर रस्त्यावरील कार १५ फूट फरफटत पुढे आली.

## महाकुंभमुळे प्रयागराजमध्ये १५ फेब्रुवारीपर्यंत ८वीपर्यंतच्या शाळा बंद

**प्रयागराज:** प्रयागराजमध्ये आयोजित महाकुंभमध्ये दररोज कोट्यावधीच्या संख्येने भाविक स्नानासाठी येत आहे. येथील मोठ्या प्रमाणातील गर्दी पाहता प्रयागराजमध्ये ८वीपर्यंतच्या शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रचंड गर्दीमुळे प्रयागराजमध्ये आठवीपर्यंतच्या शाळा आता १५ फेब्रुवारीपर्यंत बंद राहणार आहे. आठवीपर्यंतच्या शाळा आता १५ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाईन पद्धतीने घेतल्या जाणार आहेत. गेल्या तीन आठवड्यांपासून आठवीपर्यंतचे वर्ग हे ऑनलाईन पद्धतीनेच घेतले जात आड़े.

बुधवारी संध्याकाळी दोन कोटींहून अधिक भाविकांचे स्नान – महाकुंभमध्ये पाचवे स्नान पर्व माघी पोर्णिमेला होते. यावेळेस बुधवारी संध्याकाळी सहा वाजेपर्यंत तब्बल २ कोटीहून अधिक लोकांनी गंगा आणि संगमामध्ये पवित्र डुबकी घेतली. या दरम्यान स्नान करणाऱ्या भक्तांवर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टि करण्यात आली. १३ जानेवारीपासून ते आतापर्यंत ४८.२५ **कोटीहून अधिक लोकांनी केले स्नान–** मेळावा प्रशानाच्या आकडेवारीनुसार बुधवारी संध्याकाळी सहा वाजेपर्यंत तब्बल २ कोटीहून अधिक लोकांनी संगमात तसेच गंगेमध्ये स्नान केले. महाकुंभची सुरूवात १३ जानेवारीला झाली आहे. आतापर्यंत ४८.२५ कोटीहून अधिक लोकांनी येथे स्नान केले आहे.

# भारतात अवैध प्रवेश केल्यास तुरुंगवास आणि दंडाची शिक्षा

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

अधिकृत पासपोर्ट आणि व्हिसा शिवाय भारतात प्रवेश करणाऱ्यांवर आता कठोर कारवाई केली जाणार आहे. यासंदर्भात केंद्र सरकार चालू अधिवेशनात

'स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक २०२५' मांडणार आहे. त्यानुसार भारतात व्हिसा आणि पासपोर्टशिवाय प्रवेश करणाऱ्यांना ५ वर्षांचा तुरुंगवास आणि ५ लाख रुपये दंडाच्या शिक्षेची तरतूद असण्याची शक्यता आहे. सरकारच्या नव्या स्थलांतर विधेयकानुसार कोणताही परदेशी व्यक्ती बनावट कागदपत्रांसह भारतात प्रवेश करत असेल तर त्याला येथून हद्दपार केले जाऊ शकते. याशिवाय, किमान २ तुरुंगवास होऊ शकतो, जो ७ वर्षांपर्यंत वाढवता येण्याची शक्यता आहे. त्याच वेळी, १ ते १० लाख रुपयांपर्यंत दंड आकारला जाऊ शकतो, अशी माहिती सूत्रांनी दिली. स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक २०२५ चा उद्देश ४ वेगवेगळे नियम एकत्र करणे हा आहे. हे विधेयक लागू झाल्यानंतर, परदेशी कायदा १९४६, पासपोर्ट कायदा १९२०, परदेशी नोंदणी कायदा १९३९ आणि इमिग्रेशन (करिअर दायित्व कायदा) २००० मध्ये सुधारणा करून एक व्यापक कायदा बनवला जाईल. सध्या, अवैध पासपोर्ट किंवा व्हिसासह प्रवास करणाऱ्या परदेशी नागरिकांना ५ वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते.

नवीन विधेयकात, उच्च शिक्षण आणि विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या कोणत्याही परदेशी व्यक्तीची माहिती परदेशी नोंदणी अधिकाऱ्यांसोबत देखील सामायिक केली जाईल. हा नियम सर्व रुग्णालये, नर्सिंग होम आणि निवासी सुविधा असलेल्या इतर वैद्यकीय संस्थांना देखील लागू असेल. विधेयकाच्या प्रस्तावानुसार, जर कोणताही परदेशी नागरिक विहित व्हिसा कालावधीपेक्षा जास्त काळ आपल्या देशात राहिला, व्हिसा नियमांचे उल्लंघन केले किंवा कोणत्याही प्रतिबंधित क्षेत्रात गेला तर त्याला ३ वर्षांचा तुरुंगवास, ३ लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. जर एखाद्या परदेशी व्यक्तीकडे वैध पासपोर्ट किंवा व्हिसा नसल्याचे आढळून आले तर त्याला/तिला घेऊन येणाऱ्या व्यक्तीला जबाबदार धरले जाऊ शकते. परदेशी व्यक्तीला आणणाऱ्या व्यक्तीला इमिग्रेशन अधिकारी ५ लाख रुपयांपर्यंत दंड आकारू शकतो. तथापि, त्याला त्याची बाजू मांडण्याची संधी दिली जाईल. जर दंड भरला नाही, तर वस्तू आणणाऱ्या व्यक्तीला ती जप्त करता येते किंवा ताब्यात घेतले जाऊ शकते. यामध्ये विमाने, जहाजे किंवा वाहतुकीची इतर साधने समाविष्ट असू शकतात.

# महान संत रोहिदास महाराज यांनी 'जाती तोडो समाज जोडो'चा प्रथम संदेश दिला- नामदेवराव निकोसे!



**नागपूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

देशातील रंजल्या गांजलेल्या कोट्यवधी लोकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांना अंधश्रद्धेतून मुक्त करून समतेचे बिगूल अशा विषम परिस्थिती फुंकून माणूसकीचे दर्शन घडवणारे महान संत रोहिदास महाराज यांनी प्रथम जाती तोडो समाज जोडो संदेश दिला असे प्रतिपादन आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष नामदेवराव निकोसे यांनी केले. ते आज संत रोहिदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

या प्रसंगी आंरिमो चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी संतांच्या फोटोवर पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या प्रसंगी आंबेडकरी ओबीसी मोर्चाचे नेते राजीव पांजरे, प्रा. रमेश दुपारे,अतुल गंगापूरकर, रोहीत पांडे, अभिषेक पांडे यांनी पुष्प अर्पण केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मामासाहेब मेश्राम यांनी केले. या प्रसंगी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते

# महापुरुषांच्या विचारांचे वारसदार व्हा - प्रा. अनिल गवळे



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

वडगाव कोल्हाटी येथे संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची ६४८ वी जयंती निमित्त प्रबोधनाचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. अनिल गवळे उपस्थित होते. भावी पिढीला महापुरुषांचे विचार त्यांचा त्याग आणि संघर्ष समजला पाहिजे म्हणून समाजातील शिक्षित वर्गाला महापुरुषाच्या विचाराचे वारसदार व्हा असे आव्हान केले. यावेळी रिपब्लिकन क्रांती दल सामाजिक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष भूषण वाघ, अरुण मुगदल,प्रवीण आव्हाड, राहुल जोगदंड तसेच समस्त गावकरी उपस्थित होते.

# भारतीय दलीत पँथर या सामाजिक संघटनेच्या वतीने संत शिरोमणी रविदास महाराज यांची ६४८ वी जयंती साजरी



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

डॉ. अंबेडकर नगर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर ,गुरू रविदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार हार घालून अभिवादन केले व रविदास महाराज यांच्या जीवनावर पँथर नेते .लक्ष्मण दादा भुतकर यांनी मनोगत व्यक्त केले ती म्हणाली बाबासाहेब संत रविदास महाराजांना गुरु मानले आपण ही त्यांच्या विचारांना गुरु माना व त्यांच्या विचार आत्मसात करा असे आवाहन त्यांनी केले यावेळी लक्ष्मण भुतकर ,दशरथ कांबळे, प्रकाश पवार,संजय सरोदे,गजानन बिरसने, युवराज डोंगरे, बन्सी तरटे, शमलाल भागुरे विशाल तरटे, गणेश मेहेर, समाधान कस्तुरे, राजानंद नवपुरे ,एड. सतीश राऊत योगेश जुमडे, राजकुमार कांबळे, सखाराम वाकळे व प्रमुख कार्यकर्ते हजर होते

# संत रविदास जयंती; जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



छत्रपती संभाजीनगर – संत रविदास यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन करण्यात आले.उपजिल्हाधिकारी डॉ. सुचिता शिंदे यांच्याहस्ते प्रतिमापूजन करुन अभिवादन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# महापुरुषांचा अवमान रोखण्यासाठी कडक कायदा करा : उदयनराजे



**सातारा (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महापुरुषांबाबत आक्षेपार्ह वक्तव्ये, चित्रपट बनवताना होणाऱ्या चुकांबाबत केंद्र सरकारने कडक कायदा करावा अशी मागणी खासदार उदयनराजे भोसले यांनी गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेत केली आहे. दरम्यान नवी दिल्ली येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे राष्ट्रीय स्मारक उभारावे अशीही मागणी त्यांनी या वेळी केली. अलीकडच्या काळात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्राविषयी आक्षेपार्ह शब्द, वक्तव्ये केली जात आहेत. महापुरुषांबाबत चित्रपट बनवताना व्यावसायिक गोष्टींच्या नावाखाली चुकीचे दाखवले जाते. याला अठकाव घालण्यासाठी केंद्राने कायदेशीर कारवाई करणारा कायदा तयार करावा, अशी मागणी उदयनराजे यांनी केली. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचे एकूणच जीवनकार्य आणि स्वराज्यनिर्मितीचे योगदान जागतिक स्तरावर नेण्यासाठी, भावी पिढ्यांना सतत प्रेरणा मिळण्यासाठी, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचे नवी दिल्ली येथे राष्ट्रीय स्मारक तयार करावे अशीही मागणी त्यांनी या वेळी केली.

# शुक्रवारी (दि.१४) पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

कौशल्य विकास,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा, श्रीनाथ कॉलेज ऑफ फार्मसी, हायटेक महाविद्यालय परिसर, एम.आय. डी.सी. वाळूज येथे शुक्रवार दि.१४ रोजी सकाळी साडेनऊ वा. आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील नामांकीत कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित राहुन मुलाखती घेणार आहेत, असे सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी कळविले आहे.

या रोजगार मेळाव्यामध्ये वोखार्ड रिसर्च सेंटर, रत्नप्रभा मोटर्स, फोर्ब्स प्रेसीशन टूल्स अँड मशिन पार्ट्स., लिभेर अप्लायंन्सेस प्रा.लि., अलंकार ग्रूप, ग्रीव्हज कॉटन प्रा.लि., वोखार्ड लि., पॅरासन मशीनरी इं. प्रा.लि., नवभारत फर्टीलायझर्स लि, एक्सेल प्लेसमेंट, पगारीया ऑटो, देवगीरी नागरी सहकारी बँक लि., अजंता फार्मा लि., सवेरा फार्मा, मायलन लॅबोरेटरी लि. इ. नियोक्ते उमेदवारांच्या मुलाखती घेणार आहेत. कोणत्याही शाखेची पदवी, इंजिनीअरींग, डिप्लोमा, आय टी आय, एच एस सी, एस एस सी उतीर्ण इत्यादी पात्रताधारक उमेदवारांसाठी रोजगाराची साधारणपणे ५८८ पदे उपलब्ध असून विविध शैक्षणिक व व्यावसायीक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी विभागाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध रिक्तपदांना एम्प्लॉयमेंट नोंदणी असलेल्या उमेदवारांनी युजरआयडी व पासवर्ड ने लॉग इन होऊन ऑनलाईन अप्लाय करावे आणि मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

संकेतस्थळावर नोंदणी करताना अथवा रिक्तपदासाठी अप्लाय करताना काही अडचण आल्यास कार्यालयाच्या दुरध्वनी क्रमांक ०२४०-२९५४८५९ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. इच्छुक उमेदवारांनी दि.१४ रोजी सकाळी साडेनऊ वा. उपस्थित राहून पात्रतेप्रमाणे विविध नियोक्त्यांकडे मुलाखती देवून रोजगार संधीचा लाभ घ्यावा,असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता म ार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# लाडकी बहीण योजना कधीही बंद पडणार नाही, मुख्यमंत्र्यांची आश्वासनपर ग्वाही

## लाडकी बहीण अपात्र योजनेसाठी निराधार योजनेतून मदत देणार

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

लाडकी बहीण योजना ही आमच्यासाठी केवळ आर्थिक मदत नाही, तर आमच्या जगण्याचा आधार आहेङ्क, असे धुणी भांडी करणाऱ्या म हिलांनी सांगताचङ्क ही योजना कधीही बंद पडणार नाही। अशी आश्वासनपर ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली, यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी श्ररवज्ञळयेथील धुणी भांडी काम करणाऱ्या २० महिलांना रसिकाश्रम या संस्थाने 'जीवाची मुंबई, श्रमाची आनंदवारी' या उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सह्याद्री अतिथीगृह येथे भेट घडविली.

मुख्यमंत्र्यांसह झालेल्या भेटीदरम्यान अनेक महिलांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. ङ्गभांडे घासून मिळणाऱ्या ५०० रुपयांत कुटुंब कस चालवायचं, याचा प्रश्न होता. पण 'लाडकी बहीण' योजनेने आम्हाला मोठा आधार मिळाला,ङ्क असे म्हणताना एक वृद्ध महिलेचा गळा दाटून आला. मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या भावना समजून घेत लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही, यापेक्षा अधिक मदत कशी करता विचार करतोय, असे आश्वासन दिले. या महिलांसाठी ही भेट केवळ योजनांविषयी नव्हती,तर जीवनभर लक्षात राहणारा असा अनुभव होता. आम्ही कधी विमान पाहिले नव्हते, त्यातून प्रवासही केला. गेल्या दोन दिवसांत आम्हाला स्वर्गासारखी अनुभूती मिळाली,ङ्क असे एका महिलेने मुख्यमंत्र्यांना सांगितले.

या भेटीत महिलांनी आणखी एक विनंती केली की, 'सन्माननिधी म्हणून मिळणारे १० हजार रुपये दरवर्षी मिळावेत' यावर मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत 'शासन पातळीवर या मागणीचा विचार करू, असे सांगितले. तसेच काही वृद्ध महिला 'लाडकी बहीण' योजनेसाठी पात्र नसल्याने त्यांना 'निराधार योजना' अंतर्गत मदत देण्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. या भेटीचे आयोजन ङ्गरसिकाश्रयङ्ब संस्थेने केले होते. या महिलांच्या संघर्षाची जाणीव करून दिल्याबद्दल संस्थेचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले. राज्यातील गरीब जनतेचे जीवन सुसह्य करम्यासाठी कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# मिशन रेबीज: मुंबईत सुमारे २५ हजारांहून अधिक भटक्या कुत्र्यांचे लसीकरण

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुंबई महानगरपालिकेच्या वतीने 'मिशन रेबीज' या संस्थेच्या सहकार्याने मुंबईतील भटक्या श्वानांचे लसीकरण करण्यासाठी २८ सप्टेंबर २०२४ पासून सामूहिक लसीकरण कार्यक्रम राबविण्यात येत असून हा कार्यक्रम मार्च २०२५ पर्यंत सुरू राहणार आहे. मुंबई महानगरपालिकेच्या वतीने नियुक्त करण्यात आलेल्या प्राणी प्रेमी संस्थांच्या मदतीने आतापर्यंत सुमारे २५ हजारांहून अधिक भटक्या श्वानांचे लसीकरण करण्यात आले आहे.

प्राणी कल्याण करणे व प्राण्यांपासून होणारे संक्रमण टाळण्यासाठी मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांच्या निर्देशांनुसार, अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी, उप आयुक्त (विशेष) चंदा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविले जात आहेत. याच पार्श्वभूमी वर हा जनजागृतीपर उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

नागरिकांमध्ये रेबीज लसीकरण तसेच प्रतिबंधासाठी जनजागृती करण्याच्या उद्देशाने मुंबई म हानगरपालिकेच्या वतीने विशेष पुढाकार घेण्यात आला आहे. यासाठी जनजागृतीपर संदेश देणाऱ्या चित्रफितींसह एलईडी वाहन तयार करण्यात आले असून या वाहनाद्वारे संपूर्ण मुंबईत जनजागृती करण्यात येणार आहे.

पशुवैद्यकीय आरोग्य विभागाचे महाव्यवस्थापक डॉ. कलिमपाशा पठाण यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, मुंबईतील नागरिकांचे आरोग्य आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी मुंबई महानगरपालिका वचनबद्ध आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने जनजागृती एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.दरम्यान, नागरिकांमध्ये याविषयी जनजागृती व्हावी, या उद्देशाने एलईडी स्क्रिन आधारित वाहन तयार करण्यात आले आहे. याद्वारे माहितीपूर्ण संदेश प्रसारित करण्यात येतील. यामध्ये रेबीजचे धोके, लसीकरणाचे महत्व याविषयी माहिती, जबाबदार पाळीव प्राणी मालकी आणि प्राणी कल्याण प्रोत्साहन, रेबीज प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजनांमध्ये नागरिकांनी सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे आदी बाबींचा समावेश असेल. या वाहनाच्या माध्यमातून सर्व प्रशासकीय विभागांमध्ये (वॉर्ड) जनजागृती करण्यात येणार आहे. प्रामुख्याने उच्च जोखीम असलेला परिसर आणि दाट लोकवस्तीच्या परिसरांवर अधिक लक्ष केंद्रीत केले जाईल, असेही पठाण यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816